महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/सर्वसाधारण/२०२०/ 1386 दिनांक : १६.०३.२०२० 16 MAR 2020

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
प्राचार्य / संचालक
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व
व्यावसायिक व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत.**

संदर्भ :१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक कोरोना/२०२०/प्र क्र ५८/आरोग्य ५ दिनांक १४/०३/२०२०.
२. मा उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,यांचे पत्र क्रमांक, संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(४०९/२०)/तांशि-१ दिनांक १४/०३/२०२०.
३. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/१४८ दिनांक १४/०३/२०२०.
४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक तंशिविकापु/विवि/सर्वसाधारण/२०२०/१३५७ दिनांक : १४.०३.२०२०.
५. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक कोरोना/२०२०/प्र क्र ५८/आरोग्य ५ दिनांक १५/०३/२०२०.
६. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/१४९ दिनांक १६/०३/२०२०.

कोरोना विषाणूच्या (कोव्हिड१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू केलेला असून, त्यातील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासनाने संदर्भिय पत्रान्वये राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यावसाय व प्रशिक्षण केंद्र यांचे आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत सुचीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्रमांक ०४ अन्वये परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

तथापी संदर्भ क्रमांक ०५ व ०६ अन्वये कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासनाने व संचालनालयाने राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडणा-या परंतु या नागरी क्षेत्राला लागून असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक पदविका पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था दिनांक ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत सुचीत करण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था दिनांक ३१/०३/२०२० पर्यत बंद ठेवण्यात याव्यात. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागीय कार्यालयास तात्काळ सादर करावा.

तसेच आपणास असेही सुचीत करण्यात येते की, संस्थेतील आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी संबधीत संस्था प्रमुखांनी यावी.

(डॉ दि. रा. नंदनवार)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (कार्यासन क्रमांक २अ) यांना माहितीस्तव सादर.
२. मा.आयुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन पुणे ४११ ००१ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/१४९ — दिनांक : १६ मार्च,२०२०

प्रति,
१)सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,
२)संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय :- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत....

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्रमांक क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/१४८, दिनांक १४.३.२०२०
२. शासन पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक करोना-२०२०/ प्र..क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १५.३.२०२०

संचालनालयाच्या संदर्भाधीन दिनांक १४.३.२०२० रोजीच्या पत्रान्वये करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

तथापि राज्यात ब-याच प्रमाणात मोठया शैक्षणिक संस्था हया महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडतात. परंतू या संस्था नागरी क्षेत्राला लागून आहेत. तसेच मोठया शैक्षणिक संस्थांमध्ये निवासी विद्यार्थी वसतीगृहे ही आहेत. त्याचबरोबर या शैक्षणिक संस्थांमध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातून विद्यार्थी येत जात असल्याने या ठिकाणी कोविड विषाणूचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असल्याने अशा महानगरपालिका नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठया शैक्षणिक संस्था दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत शासनाने सूचित केले आहे.

या सर्व महानगरपालिका ,नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्राप्रमाणेच या क्षेत्रात येणा-या शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने इयत्ता १० वी १२ वी च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचनादेखील संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेऊन आपल्या अधिनस्त असलेल्या महानगरपालिका/ नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडणा-या परंतू या नागरी क्षेत्राला लागून असलेल्या सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबतच्या सूचना संस्थाप्रमुखांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

( डॉ.अभय ए.वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\2020-21\General Correspondence\Circular regarding close institute upto 31.3.2020.docx

## महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १५ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व)

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..(शहरी हद्दी लगतच्या शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत)**
**संदर्भ : शासन समक्रमांकाचे दि.१४ मार्च,२०२० रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात आले होते.

तथापि, राज्यात बऱ्याच प्रमाणात मोठया शैक्षणिक संस्था हया महानगरपालिका/नगरपालिका /नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडतात परंतू या संस्था नागरी क्षेत्राला लागून आहेत. तसेच मोठया शैक्षणिक संस्थामध्ये निवासी विद्यार्थी वसतीगृहे ही आहेत त्याचबरोबर या शैक्षणिक संस्थामध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातून विद्यार्थी येत जात असल्याने या ठिकाणी कोविड विषाणूचा प्रार्दुभाव होण्याची दाट शक्यता असल्याने अशा महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठया शैक्षणिक संस्था दि.३१ मार्च,२०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्राप्रमाणेच या क्षेत्रात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या अनुषंगाने १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.**
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)
प्रत जिल्हाधिकारी, (सर्व).
प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव